Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Peer Reviewed & Refereed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

ISSUE No- (CCCXII) 312

August -2021

## WOMEN'S EMPOWERMENT : ISSUES & CHALLENGES







Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor
Dr. Nilima D. Deshmukh
Principal
Sahakar Maharshi Late Bhaskarrao
Shingne Arts College,
Khamgaon, Dist. Buldana

Editor
Dr. Archana S. Dahane
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo
Dist. Wardha

B.Aadhar

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 22 | महिला सक्षमीकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान आणि आधुनिक काळातील स्त्रिया समोरची आव्हाने **डॉ. विलास एस. टाले** | 79 |
| 23 | भारतीय राज्यघटना आणि महिला सबलीकरण ची ऐतिहासीक वाटचाल एक अध्ययन **प्रा.डॉ. एन. आर. वर्मा** | 85 |
| 24 | भारतीय महिलांचे विविध क्षेत्रातील योगदान एक अवलोकन **डॉ. विलास आबा गायकवाड** | 89 |
| 25 | महिला सक्षमीकरण आणि भारतीय संविधान **भागवत भास्करराव पाटील** | 92 |
| 26 | लिंगभाव विषमता एक मानसशास्त्रीय दृष्टिक्षेप **डॉ. उमाकांत सुभाष गायकवाड** | 96 |
| 27 | योग: आरोग्य आणि महिला सक्षमीकरण **प्रा डॉ. साधना डी. वाघाडे** | 99 |
| 28 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणीक विचार **प्रा. रमेश एम. भगत** | 104 |
| 29 | भारतातील स्त्री चळवळ **प्रा. श्री. सतिश अजित कांबळे** | 107 |
| 30 | कौटूंबिक हिंसाचार कायदा व स्त्रियांचे अधिकार **प्रा. डॉ. किशोर वाहणे** | 110 |
| 31 | डॉ. संजय ढोले यांच्या विज्ञान कथेतील स्त्री प्रतिमा **प्रा.डॉ. माधव कदम** | 113 |
| 32 | ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण : एक विश्लेषणात्मक अभ्यास (विशेष संदर्भ : मानवी हक्क, स्त्रि शिक्षण व राजकीय सक्षमीकरणाच्या संदर्भात) **डॉ. निलेश र. निंबाळकर** | 116 |
| 33 | उर्दू साहित्य व महिला सबलीकरण **डॉ.शाहेदा मुनाफ** | 122 |
| 34 | मुंबई प्रांत विधानसभेत महिलांचा सहभाग **डॉ. मनिषा यादव** | 126 |
| 35 | गडचिरोली जिल्हयातील आदिवासी महिलाचे आरोग्य व बालकांचे कुपोषण **प्रा. डॉ. सुभाष आर. गिरडे** | 130 |
| 36 | '# मी टू' चळवळ : महिला सबलीकरणाची दिशा **डॉ. संदीप बी. काळे** | 136 |
| 37 | भारतीय संविधान आणि महिला सक्षमीकरण **माधवी वाय. पाटील / प्रो. ललिता चंद्राते** | 140 |
| 38 | भारतीय स्त्रीवादाच्या उद्गात्या : ताराबाई शिंदे **डॉ प्रा सुनंदा बोरकर जुलमे** | 146 |
| 39 | साहित्य और महिला सशक्तिकरण **डॉ. वारिश जैन** | 152 |
| 40 | महिला सक्षमीकरण : शासन व समाज **प्रा.डॉ.सुनिता आ.टेंगसे** | 156 |
| 41 | Development as freedom or Sustainable Development as Freedom? (Asking 'the woman question' in Chipko movement.) **Sumeha Chakraborty** | 162 |
| 42 | Female Foeticideand Infanticide In India **Dr.Nilima Dawane** | 166 |
| 43 | A Study of Impact of Covid Pandemic on Women Self help Group and Women Entrepreneurs Development **Asst. Prof. Swati V. Dhonde** | 170 |


Late Ramesh Warpudkar College Sonpeth

# महिला सक्षमीकरण : शासन व समाज

प्रा.डॉ.सुनिता आत्माराम टेंगसे,
समाजशास्त्र विभाग प्रमुख, कै रमेश वरपुडकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सोनपेठ जिल्हा परभणी

**प्रस्तावना**

जगभरात भारत देश आपली संस्कृती, परंपरा, अध्यात्म्य व भौगोलिक विविधता यामुळे ओळखला जातो. ही नाण्याची एक बाजू झाली; पण हाच देश जगभर पुरुषप्रधान संस्कृतीसाठीही प्रसिद्ध आहे. भारतात महिलांना आदिशक्तीचे रूप मानून पुरातन काळापासून पूजनीय मानले गेलेले आहे. त्याच वेळी याच भारत देशात महिला घरात आणि समाजात बंधनामध्ये अडकून पडल्या आहेत. त्यांना दुय्यम स्थान दिले जाते. त्यांचे अधिकार ,संधी व विकास यापासून त्यांना पूर्णपणे दूर केले जाते. तरीसुद्धा येथे स्त्री-पुरुष समानतेच्या गोष्टी बोलल्या जातात. महिलांच्या स्वातंत्र्य व अधिकाराविषयी कळकळ व्यक्त केली जाते. असे असतानाही निर्भया कांड किंवा कोपर्डीसारख्या अमानुष अत्याचाराच्या घटना घडतात आणि अशा वेळी आपल्यासमोर महिलांचे प्रश्न बिकट समस्या बनून उभ्या राहतात. त्यावर उपाय म्हणून समाजात महिलांना स्वायत्तता, सुरक्षा व संरक्षण देण्यासाठी सबलीकरणाचे अभियान राबविने आवश्यक आहे. ज्यामुळे आपण तिला सबला बनविण्याचा प्रयत्न करत आहोत आणि खरंच महिलांचे सबलीकरण होते आहे का?हा प्रश्न आजही निरुत्तरीत करणार आहे कारण की बहुसंख्य महिला आजही त्यांच्या अधिकारां पासून, संधीपासून वंचित असलेल्या दिसतात.

राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, मदर टेरेसा, सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी, कल्पना चावला, सुनीता विल्यम्स, पी. टी. उषा आणि इतरही अनेक कर्तृत्ववान महिलांनी या देशाचा नावलौकिक वाढविला आहे. भारतीय संविधानाने स्त्री व पुरुष यांना समान अधिकार दिले असले तरी भारताच्या पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्री आज समाज व कुटुंबाच्या बंधनात अडकून पडली आहे. ती पिता, पती आणि पुत्र यांच्या आदेशाने आणि बंधनाने ती आपले आयुष्य काढते आहे. अगदी कामकाजी, व्यवसायी, नोकरदार महिला देखील स्वतःला सक्षम मानत नाहीत. त्यांच्या दृष्टीने महिला सबलीकरण म्हणजे फक्त कार्यक्रम, व्याख्यान आहे; पण तसे न होता वास्तविकतेत महिलांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करून वैयक्तिक स्वातंत्र्य व निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे होय. महिला या देशाचे भविष्य ठरवणारी शक्ती आहे आणि त्यामुळे ही शक्ती सुदृढ व सक्षम बनविणे ही समाजाची जबाबदारी आहे.

**शोधनिबंधाचे उद्देश**

*महिला सक्षमीकरण संकल्पना स्पष्ट करणे.
*महिला सक्षमीकरणाचे शासनाचे योजना अभ्यासणे.
*महिला सक्षमीकरणाची स्थिती जानुन घेणे.
*महिला सक्षमीकरणातील अडथळे जाणून घेणे.

Late. Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

**गृहीतकृत्य**

महिला सक्षमीकरणासाठी सर्वस्तरातून सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे

**तथ्य संकलन साधने**

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 312 (CCCXII) | ISSN : 2278-9308 August, 2021

प्रस्तुत शोधनिबंधात साठी दुय्यम तथ्य संकलन साधनांचा अवलंब करण्यात आलेला आहे संदर्भ ग्रंथ पुस्तके वर्तमानपत्रे मासिके साप्ताहिके व इंटरनेटच्या माध्यमातून विचारांची मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन नेहमीच सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वेगवेगळ्या मार्गाने त्यांना मदत करत असते. महिला स्वावलंबी व स्वयंपूर्ण व्हाव्यात, त्यांचा विकास व्हावा, त्या जोमाने विकासकामांत सहभागी व्हाव्यात यासाठी *शासन अनेक योजना राबवित आहे.* महिला बचत गट, सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना आदी विविध योजना वेगवेगळ्या विभागामार्फत राबविल्या जातात. याशिवाय सर्वसमावेश असे महिला धोरणही राबविण्यात येत आहे.

*महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी महिलांसाठी 30 टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.

*मुलींसाठी सैनिकी शाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. शासकीय कादपत्रांमध्ये पाल्यांच्या वडिलांसोबत आईच्या नावाचा उल्लेख सुध्दा केला जात आहे.

*महिलांसाठी सावित्रीबाई फुले योजना, मातृत्व अनुदान स्त्री, डॉक्टरच्या सेवा अशा अनेक योजना शासनाने महिला विषयक धोरणात जाहीर केल्या आहेत.

*शासनामार्फत महिलांच्या कल्याणासाठी अनेक योजना सातत्यपूर्ण पध्दतीने राबविण्यात येत आहेत. महिलांची सुरक्षा आणि कल्याण यांची सर्वस्वी जबाबदारी शासनावर असते.

*निराधारांसाठी शासनाचा आधार...

निरक्षित महिलांसाठी स्वयंसेवी संस्थामार्फत आधारगृहाची निर्मिती झाली. दरडोई मानधन दिले जाते. तसेच या महिलांना घराचे भाडे, औषध, प्रसाधन बाबतीतील साहित्य दिले जाते. ज्या महिलांचा सांभाळ करणार असं कोणी नाही, त्यांना आश्रय देवून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी सुध्दा शासकीय महिला राज्यगृहे स्थापन केलेली आहेत. परितक्त्या, कुमारी माता, संकटग्रस्त अशा महिलांना आश्रय देण्यासाठी आश्रयस्थान उपलब्ध करुन दिलेली आहेत. त्यांच्या आरोग्याची देखील येथे काळजी घेतली जाते, तसेच अन्न, वस्त्र, निवारा याची सोय करुन त्यांना प्रशिक्षण, शिक्षण तसेच कायदेशीर मार्गदर्शनही केले जाते.

**बालिका समृध्दी योजना**

केंद्र शासनाच्या या योजनेअंतर्गत कुटुंबातील जास्तीत जास्त दोन मुलींसाठी अर्थसाहाय्य दिले जाते. शहरी ग्रामीण बालिकांसाठी ही योजना राबवली जाते, परंतु त्या 1997 नंतर जन्मलेल्या असाव्यात. राष्ट्रीय बचत योजना, सार्वजनिक मनुष्य निर्वाह निधी इत्यादी योजनेत हा निधी गुंतवला जातो आणि मग दरवर्षी शिष्यवृत्तीच्या रुपाने त्यांना लाभ दिला जातो.

*इंदिरा गांधी महिला संरक्षण योजना:पीडित महिलांसाठी इंदिरा गांधी महिला संरक्षण योजना सुरु करण्यात आलेली आहे. पीडित महिलेचे पूर्णपणे पुनर्वसन होईपर्यंत मानधनाच्या स्वरुपात मदत दिली जाते.

**देवदासी पुनर्वसन योजना:**

या योजनेअंतर्गत ज्या देवदासी असतात त्यांना किंवा त्यांच्या मुलींना विवाहासाठी 10 हजार रुपये इतके अनुदान दिले जाते. तसेच त्यांना शिक्षणासाठी सुध्दा प्रोत्साहित केले जाते. त्यांना शिक्षणासाठी 500 ते 600 रुपयापर्यंतचे अनुदान दिले जाते.

*महिलांसाठी व्यावसायिक प्रशिक्षणाची योजना:15 वर्षाच्या वरील महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा उद्देश आहे. यात निराधार निराश्रित राखीव गटातील स्त्रिया, विधवा अशा महिलांना प्राधान्य दिले जाते. यात उमेदवारांना ठरवून दिलेले विद्यावेतन नियमित मिळते.

**सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना:**

शहरी भागातील माहितीसाठी सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना राबविली जाते. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या महिलांना स्वयंरोजगाराद्वारे आर्थिक मदत भागविण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातून अर्थसाहाय्य करणारी महिला स्वावलंबन योजना राबविते. कामधेनू योजनेद्वारे महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हाव्यात म्हणून अशा महिलांना 50 टक्के काम देण्याचा राज्य शासनाचा मानस आहे.

**ग्रामीण महिला सक्षमीकरणाचा एक मार्ग: बचत गट**

आज महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी स्वबळावर उभे राहिले पाहिजे, यासाठी शासन मदत करत असते. बचतगटांमुळे महिला अभ्यासू तसेच बोलक्या होऊन दु:खामधून सावरण्याची शक्ती त्यांना मिळत आहे. जिद्द, मेहनत, धाडस या बळावर उद्योग व्यवसायातून महिलांना यशस्वीपणे समृध्दी खेचून आणता येऊ शकते. त्यासाठी त्यांना शासनाची सदैव साथ मिळत आहे.

**स्त्री सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत प्रामुख्याने खालील बाबी महत्त्वाचे ठरतात•**

१. लैंगिक आरोग्य
२. नैसर्गिक साधनसंपतीचे संरक्षण
३. आर्थिक सक्षमता
४. शैक्षणिक सक्षमता
५. राजकीय सक्षमता
६. राजकीय सक्षमता
७. मानसिक सक्षमता

**स्त्री सक्षमीकरण म्हणजे**

कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय सर्व क्षेत्रांमध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे, विकासाठी संधी उपलब्ध करून देणे, आणि स्त्री-पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरण असे म्हणतात.

**महिला आर्थिक सबलीकरण**

भारतातील बहुसंख्य स्त्रिया या घरकामात गुंतलेल्या असतात. कमी उत्पादकतेची व कमी कौशल्याची कामे स्त्रियांकडे दिली जातात. म्हणून स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जाते. महिलांचे आर्थिकदृष्ट्या सबलीकरण होण्याचे प्रमाण व वेग कमी आहे. महिला या उपजीविकेसाठी शेती, मजुरी, उद्योग, दुग्ध व्यवसाय, इ. क्षेत्रांत काम करत असतात, परंतु त्या कामाचे कधीच मोजमाप केले जात नाही. त्यामुळे आर्थिक सबलीकरणाला चालना मिळत नाही.

**स्त्री-सक्षमीकरणाच्या योजना**

महाराष्ट्र शासनाने १९९४मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्यात कालसुसंगत बदल करत २००१ मध्ये दुसरे तर २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले गेले. या सर्व धोरणांमध्ये प्रामुख्याने स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा, स्त्रीविषयक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसारमाध्यमांची भूमिका, स्वंयसेवी संस्थांचा सहभाग, स्त्रियांना केंद्रस्थानी मानून योजनांची निश्चिती, स्वंयसाहाय्यता

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 312 (CCCXII)
ISSN : 2278-9308
August, 2021

बचतगटांचा विकास, मुद्रा योजना यांचा प्रामुख्याने विचार केला जातो. शासकीय-निमशासकीय यंत्रणांमध्ये स्त्रियांना नोकरीत ३० टक्के आणि स्थानिक स्वराज्य संस्थात ५० टक्के आरक्षण मिळते. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण-प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होतात

**महिला सक्षमीकरणाची गरज**

*देशाच्या सर्वांगीण विकासासाठी सक्षमीकरण गरजेचे आहे.

*महिला सक्षमीकरणा मुळे स्त्री-पुरुषांमध्ये सर्व स्तरावर समानता प्रस्थापित होईल, परिणाम त्यामुळे समतोल विकास संकल्पना अस्तित्वात येन्यास मदत होईल.

*स्त्रियांच्या कैटूंबीक, सामाजिक, मानसिक, राजकीय ,आर्थिक, शैक्षणिक, अशा सर्वांगीन विकासासाठी महिला सक्षमीकरण होने गरजेचे आहे.

*महिलांचे मानसन्माने, समाजात निर्भयपणे जगता यावे यासाठी सक्षमीकरणाची गरज आहे

*महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने याकरिता स्वावलंबन महिला कौशल्य दृष्टीकोनातून सकारात्मक बदल घडवण्यासाठी महिला सबलीकरण आवश्यक आहे

*पुरुषांना स्त्रियांच्या त्यागाची कर्तृत्वाची सहनशीलतेची जाणीव महिला सबलीकरण आवश्यक आहे

*महिलांवर होणारे अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी महिला सबलीकरण आवश्यक आहे

**महिला सक्षमीकरनातील अडथळे**

सक्षमीकरण ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. या सक्षमीकरण प्रक्रियेसाठी समाजातील सर्व स्तरातून अथक परिश्रम होणे गरजेचे आहे .यासाठी महिलांना मानसिक दृष्ट्या सक्षम बनवून त्यांना समाज प्रवाहात आणणे आवश्यक आहे. महिलां स्वतः मधील क्षमतांची जाणीव करून देणे आवश्यक आहे. महिला सक्षमीकरण प्रक्रियेमध्ये वेगवेगळ्या अडचणी येतात त्यामध्ये प्रामुख्याने

*समाजाचा होनारा विरोध* महिला सक्षमीकरणातील हा एक मोठा अडथळा आहे. महिलांमध्ये होणाऱ्या परिवर्तनाचा स्वीकार करण्यास समाजातील पुरुष प्रधान मनोवृत्ती हा फार मोठा अडथळा आहे. पारंपरिक विचारसरणीच्या व्यक्तींकडून महिला सक्षमीकरणाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या विरोध होतो. महिलांना व्हिडिओ कहानी लेखन तुझ्या देखना त्यांना अपमानित करण्याचे प्रयत्न होतात .

*चारित्र्या वरील शंका.* महिलांना सक्षम होण्यासाठी कुटुंबाबरोबरच घराबाहेरील जबाबदाऱ्या सुद्धा पूर्ण कराव्या लागतात ,आणि आपली कर्तव्य पार पाडत असताना महिलांचा इतर महिलांशी तसेच पुरुषांशी, अधिकाऱ्यांशी, कर्मचाऱ्यांशी संपर्क येतो.कधी कधी गैरसमजुतीमुळे महिलांच्या चारित्र्यावर वेगवेगळ्या प्रकारचे आरोप केले जातात किंवा यशस्वी होणाऱ्या महिलांविषयी चारित्र्यावर शंका घेऊन अफवा पसरवल्या जातात अशा प्रकारांमुळे महिलांचे मानसिक खच्चीकरण होते.

*महिलांची स्वतःची दुय्यम मानसिकता*

महिलांची स्वतः स्वतःच्या उद्धारासाठी समोर येणे आवश्यक आहे. महिलांचे स्थान उंचावण्यासाठी प्रयत्न करावेत आणि एक महिला म्हणून होणाऱ्या विरोधाला प्रत्युत्तर द्यावे आणि स्वतःची सकारात्मक मानसिकता भक्कम ठेवावी.

*शैक्षणिक भेदभाव*

भारतामध्ये शिक्षणाच्या बाबतीत पूर्वी मुलगा आणि मुलगी हा भेदभाव केला जात असे मुलांना उच्च शिक्षण दिले जात असे आणि मुलींचे शिक्षण अर्ध्यावर सोडून त्यांचा विवाह केला जात असे उच्च शिक्षणापासून वंचित ठेवल्यामुळे आणि लवकर विवाहबद्ध झाल्यामुळे मुलींवर कौटुंबिक जबाबदाऱ्या

पडत असत आणि स्वतःच्या विकासापेक्षा कुटुंबाच्या जबाबदाऱ्या यांना कर्तव्य अधिक प्राधान्य दिल्यामुळे महिला कुटुंबात दुय्यम समजल्या जात असत.

*काम आणि वेतनातील तफावत*

महिलांच्या आणि पुरुषांच्या वेतनात आणि कामात तफावत केली जात असे स्त्रियांना कमी वेतनावर हलक्या प्रतीचे जास्त वेळ काम दिले जात असे त्यामुळे स्त्रियांची वैयक्तिक कार्यक्षमता ही कमी होत असे परिणामी आपण पुरुषांपेक्षा कमकुवत आहोत ही भावना महिलांच्या मनामध्ये निर्माण होत असे आणि हा मोठा महिला सक्षमीकरण आतील अडथळा मानला जातो

या स्वरूपाच्या विविध अडचणी किंवा अडथळे महिला सक्षमीकरणात आहेत. आज या अडचणी बहुतांशाने दूर झाले आहेत.

**समारोप**

आपल्या देशाची अर्धी लोकसंख्या ही महिलांची आहे. या लोकसंख्येसाठी सरकारद्वारे मातृ दिवस, महिलादिन, बालिकादिन, जननी सुरक्षा अभियान असे कार्यक्रम राबविले जातात. त्यामुळे समाजात स्त्री शक्तीचे महत्त्व व अधिकार जागृत करण्याचे काम केले जाते; पण यासोबत आज महिला सबलीकरण करताना सर्वप्रथम समाजात महिलांचे अधिकार व मूल्य यांच्यावर घात करणाऱ्या विघातक प्रवृत्ती अर्थात हुंडा प्रथा, स्त्री भ्रूणहत्या, निरक्षरता, लैंगिक अत्याचार, असमानता इत्यादींचा नाश करणे गरजेचे आहे. लैंगिक भेदभाव नष्ट करून समानता प्रस्थापित करणे, तसेच सामाजिक, घरगुती अन्याय व अत्याचार यांच्याविरुद्ध कठोर कायदे व उपाययोजना करणे, त्याचबरोबर महिलांना शारीरिक, सामाजिक, आर्थिक व मानसिक स्वरूपात सशक्त बनविणे ही समाजाची जबाबदारी आहे. अशा प्रकारे महिला सबलीकरण करणे म्हणजे महिलांना त्यांच्या नैसर्गिक गुणधर्म, क्षमता, परंपरा यांच्यासह समानतेने वागविणे होय. असा विचारप्रवाह समाजात प्रस्थापित झाला तर खऱ्या अर्थाने महिलांचे सबलीकरण होईल. स्त्रीशक्तीच्या रूपात देशात असलेले मनुष्यबळ विकसित करून स्त्रीशक्तीचे आरोग्य, शिक्षण, संस्कार व स्वावलंबन हे चार आधारस्तंभ समाजाने भक्कम केले तर समाजात सुराज्य व स्वराज्य दिसेल आणि फक्त अभियानापुरते कागदोपत्री नाही, तर वास्तवात महिला सबलीकरण झालेले असेल.

आपल्या भारत देशाला पूर्ण विकसित बनवण्यासाठी व परिपूर्ण विकासाचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी महिला सबलीकरण महत्त्वाचे ठरेल.

महिला सक्षमीकरणासाठी स्वतः महिला समाज आणि शासन विविध स्तरावर प्रयत्न करत असलेले दिसून येत आहे , आणि याचे सकारात्मक परिणाम महिलांची जीवनपद्धती, कार्यपद्धती, कार्यक्षमता, कुशलता, बुद्धिमता ,सक्षमता, निर्णय क्षमता, नेतृत्व क्षमता, वैचारिक प्रगल्भता यांच्यामध्ये वृद्धी होऊन महिला स्वतःच्या कुटुंबात आणि समाजात वेगळे स्थान निर्माण करण्यासाठी पुढे सरसावत आहेत आणि आज विविध स्तरात महिला पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत असलेल्या दिसतात.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 312 (CCCXII )

ISSN : 2278-9308 August, 2021

## संदर्भसूची

*महिला सक्षमीकरण स्वरूप आणि विकास संपादक प्रा. पांडुरंग मोठे अरुणा प्रकाशन लातूर, फेब्रुवारी 2016, पान 347ते 350

*महिला सबलीकरण वास्तव्य व्यथा, प्रा. वृषाली गागरे पाटील महाराष्ट्र टाइम्स 11 ऑक्टोबर 2016

*स्त्री सक्षमीकरणावर संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाचे संकेतस्थळ, स्त्री 'सक्षमीकरण आजच्या काळाची गरज आहे'

*स्त्री सक्षमीकरणाच्या योजना, लोकसत्ता 1 एप्रिल 2017

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani